Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६७ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

येवतीतील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आमदार चंद्रकांत पाटील यांची आर्थिक मदत (पान २ वर)



Selected

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मिळाला मोठा दिलासा

मुंबई : राज्यात यंदा अपुरा पाऊस आणि पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळ जाहीर करून एकूण ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांचा समावेश केला आहे. सुमारे ७५ टक्के तालुक्यांना दुष्काळाचा फटका बसला असल्याचे स्पष्ट झाले आहे. उर्वरित ९३ तालुक्यांमध्ये तुलनेने समाधानकारक पाऊस झाल्याने त्यांना या यादीतून वगळण्यात आले आहे. ट्रिगर एक निकष लागू झालेल्या भागांचाच समावेश करण्यात आला आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेती आणि शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नात मोठी घट झाल्याने मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण होत आहे. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या उद्देशाने सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

एसआयआरवरील आक्षेपांसाठी मुदतवाढ; महाराष्ट्रात १२ ऑक्टोबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार

एसआयआरच्या पार्श्वभूमीवर मतदारांना दिलासा!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात SIR प्रक्रियेवरून देशभरात राजकीय वातावरण तापले असताना आयोगाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत मतदारांना दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः SIR प्रक्रियेदरम्यान नाव जुळत नसणे अथवा इतर तार्किक विसंगती आढळल्याने नोटीस बजावण्यात आलेल्या मतदारांच्या बाबतीत आयोगाने महत्त्वाचे बदल केले आहेत. तसेच महाराष्ट्रासाठी दावे, आक्षेप आणि हरकती दाखल करण्याच्या मुदतीतही वाढ करण्यात आली आहे.

नोटीस दिलेल्या मतदारांच्या घरीच बीएलओकडून कागदपत्रे स्वीकारली जाणार

SIR प्रक्रियेदरम्यान ज्या मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळली आहे आणि त्यांना नोटीस देण्यात आली आहे, अशा मतदारांच्या घरी आता BLO अर्थात बूथ लेव्हल ऑफिसर भेट देणार आहेत. संबंधित मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारून ती पुढील प्रक्रियेसाठी निवडणूक यंत्रणेकडे सादर केली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्येक नोटीसधारक मतदाराला ERO किंवा AERO कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, नोटीस बजावण्यात आलेल्या व्यक्तींना सुनावणीसाठी ERO किंवा AERO कार्यालयात नियमितपणे बोलावले



जाणार नाही. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच सुनावणी घेण्यात येईल आणि ती ऑनलाइन पद्धतीने होऊ शकते. तसेच संबंधित मतदार प्रौढ असल्यास त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती सुनावणीसाठी उपस्थित राहू शकणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. SIR प्रक्रियेत कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून विशेष मदत केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. रात्रीच्या निवाऱ्यांमध्ये राहणारे नागरिक, मजूर, गरीब आणि बेघर व्यक्ती यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी ही केंद्रे कार्यरत केली जाणार आहेत. त्यामुळे मतदार यादीतील नोंद, कागदपत्रे आणि SIR प्रक्रियेबाबत अडचणी असलेल्या नागरिकांना मदत मिळण्याची शक्यता आहे. बैठकीतील सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी एक म्हणजे महाराष्ट्रातील दावे, आक्षेप आणि हरकती दाखल करण्यासाठी मुदतवाढ. आता नागरिकांना १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आपले दावे अथवा आक्षेप नोंदवता येणार आहेत. तसेच नोटीस आणि प्राप्त आक्षेप निकाली काढण्याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या बैठकीचा अजेंडा यापुढे बैठकीपूर्वी संबंधितांना पाठवला जाईल आणि बैठकीची माहितीही जारी केली जाणार आहे. सर्व अधिकाऱ्यांचे APAR अर्थात वार्षिक कामगिरी मूल्यांकन अहवाल ठरलेल्या वेळापत्रकानुसार ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आयोगाच्या बैठकीबाबतही महत्त्वाचे निर्णय

अधिकाऱ्यांच्या विदेश दौऱ्यांसाठी आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार आहे. तसेच निवडणूक आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, आयोगाने कॅबिनेट सचिवांना पाठवलेल्या पत्राबाबतही स्पष्टीकरण दिले. हे पत्र आयोगाच्या कोणत्याही धोरणाशी किंवा आयटी विभागाशी संबंधित नव्हते, तर प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याच्या कामकाजाशी संबंधित होते, असे आयोगाने स्पष्ट केले. आयटी विभागातील डेप्युटी इलेक्शन कमिश्नर यांचे नियंत्रण कधीही मागे घेण्यात आले नव्हते, असेही आयोगाने नमूद केले आहे. प्रत्येक नोटीसधारक मतदाराला ERO किंवा AERO कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

पुणे मेट्रोला विघ्नहर्ता पावला! गणेशोत्सवात ४८ लाखांहून अधिक प्रवाशांचा प्रवास

जन सम्राट टाईम्स

पुणे प्रतिनिधी: गणेशोत्सवातील गर्दी आणि शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुणेकरांनी यंदाही मेट्रोला मोठी पसंती दिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. १४ ते २५ सप्टेंबरदरम्यानच्या १२ दिवसांत पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर तब्बल ४८ लाख ३२ हजारांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. या कालावधीत मेट्रोला प्रवासी भाड्यातून सुमारे ७ कोटी ४९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. गणेशोत्सवातील गर्दीचा सर्वाधिक परिणाम विसर्जनाच्या काळात जाणवला. गौरी विसर्जनाच्या दिवशी, १९ सप्टेंबर रोजी प्रवासीसंख्येने उच्चांक गाठला. त्यानंतर गणेश विसर्जनाच्या दिवशी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मेट्रोची सेवा रात्रभर सुरू ठेवण्यात आली. परिणामी २४ तासांत तब्बल ५ लाख ८० हजार प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला. या दिवशी मेट्रोला ८५ लाख ६१ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. मंडई स्थानकावर सर्वाधिक गर्दी गणेश विसर्जनाच्या दिवशी मेट्रोच्या ११ स्थानकांवर प्रत्येकी २० हजारांहून अधिक प्रवाशांची नोंद झाली. यामध्ये महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकाने सर्वाधिक प्रवासीसंख्या नोंदवली. या स्थानकावर तब्बल ७० हजार ३७५ प्रवाशांनी प्रवास केला. गणेश विसर्जनासाठी शहरातील विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. रस्त्यांवरील वाहतूक कोंडी, पार्किंगची समस्या आणि गर्दीच्या पार्श्वभूमीवर मेट्रोने नागरिकांना जलद आणि सोयीचा पर्याय उपलब्ध करून दिला. डिजिटल तिकिटाला पुणेकरांची पसंती गणेशोत्सवाच्या काळात पुणेकरांनी मेट्रोच्या डिजिटल तिकीट व्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात पसंती दिली. एकूण प्रवाशांपैकी ७१ टक्के प्रवाशांनी डिजिटल



तिकिटाचा, तर २९ टक्के प्रवाशांनी कागदी तिकिटाचा वापर केला. तिकीट खरेदीच्या व्यवहारांचा विचार केला असता डिजिटल व्यवहारांचे प्रमाण आणखी लक्षणीय राहिले. एकूण तिकीट व्यवहारांपैकी तब्बल ८६ टक्के व्यवहार डिजिटल पद्धतीने, तर केवळ १४ टक्के व्यवहार रोखीने करण्यात आले. गणेशोत्सवाच्या काळात मेट्रोची वाढलेली प्रवासीसंख्या आणि डिजिटल तिकीट व्यवहारांचा वाढता वापर यामुळे पुणेकरांच्या सार्वजनिक वाहतुकीच्या सवयींमध्ये होत असलेला बदल अधोरेखित झाला आहे. विशेषतः विसर्जनाच्या दिवशी रात्रभर सेवा सुरू ठेवल्याने मोठ्या गर्दीच्या काळात मेट्रोची भूमिका अधिक महत्त्वाची ठरली.गणेशोत्सवातील गर्दी आणि शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुणेकरांनी यंदाही मेट्रोला मोठी पसंती दिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. १४ ते २५ सप्टेंबरदरम्यानच्या १२ दिवसांत पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवर तब्बल ४८ लाख ३२ हजारांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. या कालावधीत मेट्रोला प्रवासी भाड्यातून सुमारे ७ कोटी ४९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. गणेशोत्सवातील गर्दीचा सर्वाधिक परिणाम विसर्जनाच्या काळात जाणवला. गौरी विसर्जनाच्या दिवशी, १९ सप्टेंबर रोजी प्रवासीसंख्येने उच्चांक गाठला. त्यानंतर गणेश विसर्जनाच्या दिवशी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मेट्रोची सेवा रात्रभर सुरू ठेवण्यात आली. परिणामी २४ तासांत तब्बल ५ लाख ८० हजार प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला. या दिवशी मेट्रोला ८५ लाख ६१ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले.



रोहित-गिल सलामीला, ऋतुराजला मोठी जबाबदारी!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला रविवार, 27 सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. मालिकेतील पहिला सामना तिरुवनंतपुरमच्या ग्रीनफिल्ड इंटरनॅशनल स्टेडियमवर रंगणार आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ घरच्या मैदानावर विजयी सुरुवात करण्याच्या तयारीत आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेमुळे काही खेळाडू भारतीय टी-20 संघासोबत जपानमध्ये असले, तरी वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी निवड समितीने मजबूत संघाची निवड केली आहे. त्यामुळे पहिल्या सामन्यात अंतिम अकरामध्ये कोणाला संधी मिळणार, याची उत्सुकता आहे.वनडे मालिकेत शुभमन गिलसोबत रोहित शर्मा सलामीला येण्याची शक्यता आहे. रोहितने इंग्लंडविरुद्धच्या लॉर्ड्सवरील आपल्या अखेरच्या वनडे सामन्यात शानदार शतक झळकावले होते. त्यामुळे यशस्वी जैस्वाल संघात असला, तरी रोहितच्या अनुभवाला पसंती मिळण्याची शक्यता आहे. रोहित आणि गिल डावाची सुरुवात करतील, तर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची शक्यता आहे.श्रेयस अय्यरच्या अनुपस्थितीत चौथ्या क्रमांकासाठी



ऋतुराज गायकवाड, नमन धीर आणि ध्रुव जुरेल यांच्यात चुरस आहे. मात्र, ऋतुराजच्या अनुभवामुळे त्याला अंतिम अकरामध्ये स्थान मिळण्याची शक्यता अधिक मानली जात आहे. फलंदाजीची जबाबदारी मिळू शकते. त्यानंतर केएल राहुल पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करत यष्टिरक्षणाची जबाबदारी सांभाळू शकतो.नितीश कुमार रेड्डी आणि रवींद्र जडेजा हे अष्टपैलू खेळाडू भारताच्या मधल्या फळीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. इंग्लंडविरुद्धच्या मागील वनडे मालिकेत दोघांनाही खेळता आले नव्हते. त्यामुळे वेस्ट इंडिजविरुद्ध मिळणाऱ्या संधीचा फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. गोलंदाजीमध्ये जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत मोहम्मद सिराज वेगवान आक्रमणाचे नेतृत्व करेल. त्याच्यासोबत गुरनूर ब्रार आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी दार हाही संघात आहे. तो फलंदाजीही करू शकतो. मात्र, पहिल्या वनडेसाठी सिराज, गुरनूर आणि प्रसिद्ध कृष्णा या तिघांना पसंती मिळण्याची शक्यता आहे. फिरकी विभागाची जबाबदारी कुलदीप यादवकडे असू शकते. इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत कुलदीप संघाचा भाग होता, मात्र त्याला एकाही सामन्यात अंतिम अकरामध्ये स्थान मिळाले नव्हते.

सोन्याच्या दरात पुन्हा बदल

मुंबई : भारतात 27 सप्टेंबर रोजी 24 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 15,268 रुपये, 22 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 13,995 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 11,451 रुपये आहे. प्रति 10 ग्रॅमचा दर 1,39,950 रुपये, 1,14,510 रुपये आहे. भारतात 27 सप्टेंबर रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम 245 रुपये आणि प्रति किलोग्रॅम 2,45,000 रुपये आहे.भारतात 26 सप्टेंबर रोजी 24 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 15,285 रुपये, 22 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 14,011 रुपये आणि 18 कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर 11,464 रुपये होता.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेचा 'शिवसेना मदत कक्ष'!



जन सम्राट टाईम्स

मुंबई| प्रतिनिधी: राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ठाकरेंच्या शिवसेनेने मदतीचा हात पुढे केलाय. ठाकरेंची शिवसेना राज्यातील प्रत्येक तालुका स्तरावर आता 'शिवसेना शेतकरी मदत केंद्र' सुरू करणारेय. पीक विमा, कर्जमाफी, शासकीय मदत आणि विविध योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी ही मदत केंद्रे काम करणारायेत. 28 सप्टेंबरला अमरावतीतून खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते याची सुरुवात होणार आहे.राज्यातील अनेक भागांमध्ये अपुऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांवर संकट निर्माण झालंय. सोयाबीनसह विविध पिकांचं नुकसान झाल्याने शेतकरी पीक विमा, आर्थिक मदत आणि कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करतायेत. याच पार्श्वभूमीवर ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने दुष्काळग्रस्त भागात प्रत्येक तालुक्यात 'शिवसेना शेतकरी मदत केंद्र' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. या केंद्रांमध्ये शेतकऱ्यांना पीक विम्याचे दावे, विमा नुकसानभरपाई, कर्जमाफी, शासनाच्या दुष्काळी उपाययोजना आणि उपलब्ध विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केलं जाणारेय. तसंच अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रं आणि संबंधित विभागांकडे करावयाच्या पाठपुराव्यातही शेतकऱ्यांना मदत केली जाणार असल्याचं शिवसेनेकडून सांगण्यात आलंय.दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध सवलती आणि मदतीच्या उपाययोजना जाहीर होण्याची शक्यता असते. मात्र, या योजनांचा लाभ घेताना कागदपत्रं, ऑनलाइन अर्ज आणि विमा दाव्यांच्या प्रक्रियेत अनेकदा शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. हीच अडचण लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरकारी मदतीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी मदत केंद्रांच्या माध्यमातून घेण्यात येणार असल्याचं शिवसेनेचे उपनेते आणि आमदार नितीन देशमुख म्हणाले. विशेष म्हणजे, केवळ मार्गदर्शन न करता शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संबंधित शासकीय यंत्रणेकडे पाठपुरावा करण्याची भूमिकाही या केंद्रांच्या माध्यमातून घेतली जाणार आहेय. त्यामुळे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सुरू होणारी ही मदत केंद्रं शेतकऱ्यांसाठी कितपत प्रभावी ठरतात, राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी ठाकरेंच्या शिवसेनेने मदतीचा हात पुढे केलाय. ठाकरेंची शिवसेना राज्यातील प्रत्येक तालुका स्तरावर आता 'शिवसेना शेतकरी मदत केंद्र' सुरू करणारेय. पीक विमा, कर्जमाफी, शासकीय मदत आणि विविध योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी ही मदत केंद्रे काम करणारायेत. 28 सप्टेंबरला अमरावतीतून खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते याची सुरुवात होणार आहे.राज्यातील अनेक भागांमध्ये अपुऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांवर संकट निर्माण झालंय.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

अजितदादांचं नाव घेत सुनेत्रा पवारांसमोर शेतकऱ्याचा आक्रोश

आम्ही जगायचं तरी कसं?; नांदेडमध्ये दुष्काळाची पाहणी करताना शेतकऱ्याने मांडली व्यथा

जन सम्राट टाईम्स

नांदेड । प्रतिनिधी: पावसाअभावी उभी पिके करपून गेल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. अशाच परिस्थितीत नांदेड जिल्ह्यातील सोनखेड-लोहा परिसरात दुष्काळग्रस्त शेतकऱ्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली. "दोन वर्षांपासून अतिवृष्टीमुळे शेती खरडून गेली आणि यंदा पावसाअभावी उभी पिके वाळून गेली. आम्ही जगायचे तरी कसे? आता आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही," असे म्हणत संबंधित शेतकऱ्याने शासनाकडे मदतीची आर्त मागणी केली. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या होत्या. लोहा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागात त्यांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. हाता-तोंडाशी आलेले सोयाबीन, कापूस आणि इतर पिके पावसाअभावी करपल्याने एका शेतकऱ्याचा भावनिक उद्रेक झाला. "आम्ही दादांच्या विश्वासावर होतो. आज दादा असते तर आतापर्यंत कोरडा दुष्काळ जाहीर झाला असता आणि कर्जमाफी मिळाली असती," अशी भावना व्यक्त करत या शेतकऱ्याने प्रति हेक्टर ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी केली. शेतकऱ्याची व्यथा ऐकल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी त्यांना दिलासा देत



शासनाकडून शक्य ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. "मी मराठवाड्याचीच लेक आहे. मराठवाड्यातील दुष्काळाची परिस्थिती मला चांगली माहिती आहे.

शेतकऱ्यांच्या भावनांची शासनाने गंभीर दखल घेतली आहे," असे त्यांनी सांगितले. नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे ज्या प्रकारे नुकसान झाले आहे, त्यानुसार मदत देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबतही त्यांनी आश्वासन दिले. दुष्काळाच्या काळात शेतकरी कुटुंबांना पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी, चारा तसेच मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी सांगितले. "शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील," असे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. नांदेड जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने सोयाबीनची वाढ खुंटली असून शेंगा भरल्या नाहीत. कापसालाही अपेक्षित बोंडधारणा झाली नाही. याशिवाय हळद, तूर, मूग आणि उडीद या पिकांनाही फटका बसला आहे. पावसाअभावी पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाला पाठवलेल्या अहवालात नमूद केली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकसानीची माहिती दिली. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे, आमदार आनंद बोढारकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.पावसाअभावी उभी पिके करपून गेल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. अशाच परिस्थितीत नांदेड जिल्ह्यातील सोनखेड-लोहा परिसरात दुष्काळग्रस्त शेतकऱ्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली. "दोन वर्षांपासून अतिवृष्टीमुळे शेती खरडून गेली आणि यंदा पावसाअभावी उभी पिके वाळून गेली. आम्ही जगायचे तरी कसे? आता आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

जळगावचे सर्व 15 तालुके दुष्काळाच्या 'ट्रिगर-1'मध्ये नाशिकच्या विभागीय बैठकीत गुलाबराव पाटलांनी मांडली पीकस्थिती!

पीक विम्यासह शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही पाठपुरावा

जन सम्राट टाईम्स

पाळधी/जळगाव। प्रतिनिधी : पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिकांवर झालेल्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील २६५ तालुक्यांचा दुष्काळाच्या 'ट्रिगर-१'मध्ये समावेश करण्यात आला असून, त्यात जळगाव जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांचा समावेश आहे. एरंडोल, पारोळा, चाळीसगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल आणि धरणगाव या सर्व तालुक्यांचा यादीत समावेश असल्याचे उपलब्ध माहितीत नमूद आहे. जळगाव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांची पीकस्थिती दुष्काळी निकषांच्या कक्षेत आणण्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नाशिक येथील विभागीय आढावा बैठकीत जिल्ह्याची वस्तुस्थिती मांडली होती. पावसाची केवळ एकूण आकडेवारी न पाहता पावसातील दीर्घ खंड, प्रत्यक्ष शेतातील पिकांची स्थिती आणि उत्पादनातील संभाव्य घट यांचाही विचार करावा, अशी भूमिका त्यांनी बैठकीत मांडल्याचे वृत्त आहे.



नाशिकच्या बैठकीत पीक विम्याचा मुद्दाही उपस्थित कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे झालेल्या बैठकीत जळगाव जिल्ह्यातील पीक परिस्थितीबरोबरच पीक विम्याचा प्रश्नही चर्चेत आला. विमाधारक शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीनुसार लाभ मिळावा आणि प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी कार्यवाही व्हावी, अशी मागणी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मांडल्याचे वृत्त आहे. बैठकीत त्यांच्या आणि कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्यात पीक विम्याच्या विषयावर तीव्र चर्चा झाल्याचेही वृत्त प्रसिद्ध झाले आहे. बांधावर जाऊन पिकांची पाहणी नाशिकच्या बैठकीनंतर गुलाबराव पाटील यांनी बोदवड आणि मुक्ताईनगर तालुक्यांतील शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मका, कापूस, सोयाबीन आदी पिकांची पाहणी केली. पावसाच्या खंडामुळे उत्पादनावर झालेला परिणाम वस्तुनिष्ठपणे नोंदवावा आणि शासनाच्या निकषांनुसार पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. दरम्यान, जळगाव जिल्ह्यातील कापूस उत्पादनावरही पावसाच्या खंडाचा परिणाम झाल्याचे प्रत्यक्ष पीक पाहणी व पीक कापणी प्रयोगातून समोर येत आहे. दुष्काळी उपाययोजनांचा मार्ग मोकळा 'ट्रिगर-१' लागू झाल्यानंतर संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासनाच्या निर्धारित उपाययोजना राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलाबाबत सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेतील कामांच्या निकषांमध्ये शिथिलता, आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पशुधनासाठी चारा आणि अन्नधान्याची उपलब्धता अशा उपाययोजनांचा समावेश आहे. मात्र, प्रत्यक्ष पीक नुकसानीच्या आर्थिक मदतीसाठी पंचनामे व वस्तुनिष्ठ मूल्यांकनाची प्रक्रिया महत्त्वाची राहणार आहे. शासनाच्या निर्धारित प्रक्रियेनुसार नुकसानीचे मूल्यांकन झाल्यानंतर पुढील मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. सर्व १५ तालुके यादीत जळगाव जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांचा 'ट्रिगर-१'मध्ये समावेश झाल्यामुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे अधिकृत पातळीवर मूल्यांकन करण्याची प्रक्रिया पुढे सरकली आहे. दरम्यान, नाशिक विभागातील ४९ तालुक्यांमध्ये जळगावच्या १५ तालुक्यांचा समावेश असल्याची जिल्हानिहाय यादी प्रसिद्ध झाली आहे.

शालेय कुस्ती स्पर्धेत गोपीचंद पुना पाटील विद्यालयाच्या तिन्ही कुस्तीपटूंचे दमदार यश



जन सम्राट टाईम्स

भडगाव : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद, जळगाव तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कोळगाव येथील कुस्तीपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत विद्यालयाच्या १७ व १९ वर्षांआतील तिन्ही महिला कुस्तीपटूंनी आपापल्या वजनगटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक पटकावला. या दमदार कामगिरीच्या जोरावर तिन्ही खेळाडूंची नाशिक विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही विभागीय स्पर्धा बलकवडे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, भगूर, जि. नाशिक येथे होणार आहे. तालुक्यापासून जिल्ह्यापर्यंत विजयी कामगिरी यापूर्वी झालेल्या भडगाव तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेतही गोपीचंद पुना पाटील विद्यालयाच्या कुस्तीपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली होती. विद्यालयाच्या तब्बल ११ खेळाडूंनी आपल्या-आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. मुलींच्या गटातही विद्यालयाच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी नोंदवली होती. तालुकास्तरीय स्पर्धेतील यशानंतर जिल्हास्तरीय स्पर्धेतही विद्यालयाच्या महिला कुस्तीपटूंनी आपली कामगिरी कायम ठेवत तिन्ही खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे आता त्या नाशिक विभागीय स्पर्धेत जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

मुलाला वाचवताना वडिलांचा बुडून मृत्यू; १४ वर्षीय मुलाचा अद्याप शोध नाही!

जन सम्राट टाईम्स



नाशिक | प्रतिनिधी : वडील पाण्यात पोहत असल्याचे पाहून मुलालाही पाण्यात उतरण्याचा मोह झाला. मात्र, काही वेळातच मुलगा बुडू लागल्याने त्याला वाचवण्यासाठी वडिलांनी पाण्यात धाव घेतली. परंतु पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडीलही प्रवाहासोबत वाहून गेले. या दुर्दैवी घटनेत वडिलांचा बुडून मृत्यू झाला असून, १४ वर्षीय मुलाचा अद्याप शोध लागलेला नाही. गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला पहिले बारी ते वाडीवऱ्हे रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या डोहात ही घटना घडली. संजय धोंडू सोनवणे (वय ४८, रा. सावतानगर, अक्षय चौक, सिडको) असे मृत्यू झालेल्या वडिलांचे नाव आहे. त्यांचा १४ वर्षीय मुलगा श्री सोनवणे हा पाण्यात वाहून गेला आहे. पोलिस आणि बचाव पथकाकडून त्याचा शोध सुरू आहे. सहकाऱ्यांसोबत फिरण्यासाठी गेले होते संजय सोनवणे हे रिअल इस्टेट व्यवसायात कार्यरत होते. गुरुवारी गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला ते मुलगा श्री आणि रिअल इस्टेट व्यवसायातील काही सहकाऱ्यांसोबत फिरण्यासाठी गेले होते. जेवण झाल्यानंतर ते पहिले बारी ते वाडीवऱ्हे रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या डोहाजवळ थांबले. संजय सोनवणे यांना पोहता येत असल्याने ते पाण्यात उतरून पोहत होते. त्यांचे सहकारीही जवळच होते. वडील पाण्यात पोहत असल्याचे पाहून मुलगा श्री यानेही पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र, काही वेळातच तो पाण्यात बुडू लागला. मुलाला वाचवण्यासाठी वडिलांची धाव मुलगा पाण्यात बुडत असल्याचे संजय सोनवणे यांच्या लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्याला वाचवण्यासाठी पाण्यात धाव घेतली. मात्र, डोहातील पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात संजय सोनवणे स्वतःही पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. तातडीने शोधमोहीम सुरू करण्यात आली. रात्री साडेसातच्या सुमारास संजय सोनवणे यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. मात्र, घटनेनंतर सुमारे १५ तास उलटूनही १४ वर्षीय श्री सोनवणे याचा शोध लागलेला नाही. त्याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकाकडून प्रयत्न सुरू आहेत. सिडको परिसरात हळहळ संजय सोनवणे हे सिडकोतील सावतानगर, अक्षय चौक परिसरातील रहिवासी होते. रिअल इस्टेट व्यवसायाच्या माध्यमातून ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला घडलेल्या या दुर्दैवी घटनेने सिडको परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पाण्यात पोहत असल्याचे पाहून मुलालाही पाण्यात उतरण्याचा मोह झाला.परंतु पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडीलही प्रवाहासोबत वाहून गेले. या दुर्दैवी घटनेत वडिलांचा बुडून मृत्यू झाला असून, १४ वर्षीय मुलाचा अद्याप शोध लागलेला नाही. गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला पहिले बारी ते वाडीवऱ्हे रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या डोहात ही घटना घडली.

येवतीतील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आमदार चंद्रकांत पाटील यांची आर्थिक मदत

जन सम्राट टाईम्स



बोदवड | प्रतिनिधी: तालुक्यातील येवती येथील शेतकरी स्व. काशिनाथ मारुती बावस्कर यांच्या कुटुंबीयांची आमदार चंद्रकांतभाऊ पाटील यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबाला वैयक्तिक स्वरूपात तातडीची आर्थिक मदत म्हणून २१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. काशिनाथ बावस्कर यांच्या निधनामुळे त्यांच्या तीन मुलींवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. काही वर्षांपूर्वीच त्यांच्या आईचेही निधन झाल्याने तिन्ही मुलींनी आई-वडिलांचे छत्र गमावले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार चंद्रकांत पाटील यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांना आधार दिला. कुटुंबातील ज्येष्ठ कन्या कु. आरती काशिनाथ बावस्कर यांच्याकडे शिवसेना विधानसभा क्षेत्रप्रमुख प्रा. हितेश पाटील यांच्या हस्ते २१ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली. तीन मुलींच्या शिक्षणासाठी मदतीचे आश्वासन तिन्ही मुलींच्या पुढील शिक्षणासाठी शासनाच्या माध्यमातून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असे आमदार चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. तसेच त्यांच्या भविष्यासाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित प्रशासनाशी चर्चा करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकरी काशिनाथ बावस्कर यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर कुटुंबाला तातडीची मदत आणि पुढील आधाराची गरज असल्याची बाब स्थानिक पातळीवर चर्चेत आली आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया प्रशासनाच्या माध्यमातून केली जाते. मान्यवरांची उपस्थिती यावेळी जलसंपदा मंत्री गिरीशभाऊ महाजन, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे, भाजप जिल्हाध्यक्ष चंद्रकांतदादा बावस्कर, मुक्ताईनगरचे डीवायएसपी श्री. गावित, बोदवड तहसीलदार श्री. सपकाळे, बोदवड पोलीस निरीक्षक श्री. लवंगडे यांच्यासह शिवसेना, युवासेना व भाजप महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत मिळाल्याने तसेच मुलींच्या शिक्षणासाठी शासकीय मदतीचे आश्वासन मिळाल्याने कुटुंबाला पुढील काळात आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कला केंद्रातील अंतर्गत वादातून गर्भवती महिलेची जाळून हत्या!

गरताडबारीतील गुन्ह्याचा तीन दिवसांत उलगडा

जन सम्राट टाईम्स



धुळे । प्रतिनिधी: कला केंद्रातील अंतर्गत वादातून रायगड येथील गर्भवती महिलेची बीड येथे मारहाण करून बेशुद्ध केल्यानंतर धुळे तालुक्यातील गरताडबारी परिसरात पेट्रोल ओतून जाळून हत्या केल्याचा प्रकार पोलिस तपासातून समोर आला आहे. मोहाडी पोलिसांनी या प्रकरणाचा अवघ्या तीन दिवसांत तपास करून चार आरोपींना अटक केली असून, दोन आरोपी अद्याप फरार आहेत. अटक केलेल्या आरोपींमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. मृत महिलेचे नाव पिंकी हनुमंत काटकर (वय ३१, रा. रायगड) असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. संशयित वाहनाच्या आधारे तपासाला दिशा घटना उघडकीस आल्यानंतर मोहाडी पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने महामार्गावरील विविध ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची सलग सुमारे अकरा तास तपासणी केली. या तपासादरम्यान हुंदाई मोबिलिओ (क्रमांक एमएच ४३/एआर ४०७०) या संशयित वाहनाचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. वाहनाच्या तपासातून पोलिसांनी धाराशिव व अहिल्यानगर परिसरात तपासाची दिशा वळवली. त्यानंतर कला केंद्रात काम करणाऱ्या दोन महिलांसह चौघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान या प्रकरणासंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. बीडमध्ये मारहाण; गरताडबारीत हत्या केल्याचा तपासातील दावा पोलिसांच्या तपासानुसार, कला केंद्रातील अंतर्गत वादातून आरोपींनी बीड येथे संबंधित महिलेला मारहाण केली. त्यात ती बेशुद्ध झाल्यानंतर आरोपी राजस्थानच्या दिशेने निघाले. प्रवासादरम्यान धुळे जिल्ह्यातील गरताडबारी परिसरात महिलेवर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिल्याचा आरोप आहे. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला. घटनेनंतर मोहाडी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत सीसीटीव्ही फुटेज, संशयित वाहन आणि इतर उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचल्याचे पोलिसांनी सांगितले. चौघांना अटक; दोघांचा शोध सुरू या प्रकरणात मोहाडी पोलिसांनी सर्फराज ऊर्फ शफिक अलीम मोमिन (३८), धाराशिव आरिफ ऊर्फ खुज्या आसिफ शेख (३१), धाराशिव स्वाती ऊर्फ आरती गणेश कुऱ्हाडे (२८), अहिल्यानगर लक्ष्मी बालाजी पवार (३०), धाराशिव या चौघांना अटक केली आहे.

धरणगाव तालुक्यात World Vision संस्थेचा वार्षिक मूल्यांकन कार्यक्रमबाल संरक्षण, उपजीविकेसह विविध उपक्रमांचा आढावा

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: सेवाभावी संस्थेच्या वतीने धरणगाव तालुक्यात वार्षिक मूल्यांकन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वर्षभर तालुक्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत आगामी काळातील कामाचे नियोजन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमात बाल संरक्षण, शिक्षण, आरोग्य व पोषण, सुरक्षित पाणी व स्वच्छता, उपजीविका, बचत गट तसेच समुदाय सहभाग या विषयांवर वर्षभर करण्यात आलेल्या कामाची माहिती घेण्यात आली. विविध उपक्रमांमुळे बालक, महिला आणि कुटुंबांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. वर्षभरातील कामकाजादरम्यान आलेल्या अडचणी, अनुभव, उपलब्धी आणि त्यातून मिळालेल्या शिकवणीवर कार्यक्रमात सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी वर्षात समुदायाच्या गरजा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अधोरेखित करण्यात आले. बालकांचे संरक्षण, शिक्षण व आरोग्य यासोबतच कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या उपक्रमांना आगामी काळात अधिक बळ देण्याबाबत चर्चा झाली. कार्यक्रमास World Vision संस्थेचे अधिकारी जितेंद्र गोरे, राजेश वायदांडेकर, सुशीला वडवी, प्रथम कांबळे, स्वयंसेवक आरती पाटील, वैष्णवी पाटील, जितेंद्र पाटील, जिल्हा परिषद शिक्षक कैलास पवार, डॉ. शिंपी, संजय पाटील, प्रतिभा पाटील यांच्यासह गावातील समुदाय प्रतिनिधी, बचत गटातील महिला, बाल संरक्षण समितीचे सदस्य आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

मनमाडहून शेकडो भाविक सम्मेद शिखरजी यात्रेसाठी रवाना



जन सम्राट टाईम्स

मनमाड| प्रतिनिधी: जैन धर्मियांचे पवित्र तीर्थक्षेत्र सम्मेद शिखरजी, जिल्हा गिरिडीह (झारखंड) येथे दर्शन व धार्मिक यात्रेसाठी मनमाड शहरातून शेकडो भाविकांचा समूह शनिवारी, दि. २६ सप्टेंबर रोजी उत्साहात रवाना झाला. मनमाड रेल्वे स्थानकावर यात्रेकरूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. या धार्मिक यात्रेत महिला, पुरुष तसेच लहान मुलांचाही मोठ्या संख्येने सहभाग आहे. यात्रेला रवाना होताना भाविकांनी *"जय पार्श्वनाथ"*चा जयघोष करत परिसर भक्तिमय केला.

धार्मिक श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात भाविकांनी यात्रेचा शुभारंभ केला. अनेक दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान भाविकांकडून सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यात येणार असून विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चना आणि तीर्थवंदना केली जाणार आहे. जैन समाजाच्या धार्मिक परंपरेत सम्मेद शिखरजीला विशेष महत्त्व असल्याने या यात्रेबाबत भाविकांमध्ये विशेष उत्सुकता आहे. या तीर्थयात्रेचे आयोजन प्रभा पाटणी, अंकिता पाटणी, प्रकाश पाटणी, स्वप्निल पाटणी आणि जिया पाटणी यांनी केले आहे. त्यांच्या नियोजनातून यात्रेकरूंसाठी विविध व्यवस्था करण्यात आल्या आहेत. यात्रेच्या निमित्ताने मनमाड रेल्वे स्थानकावर भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. सहप्रवाशांनी एकमेकांना शुभेच्छा देत धार्मिक वातावरणात यात्रेला निरोप दिला. जैन धर्मियांचे पवित्र तीर्थक्षेत्र सम्मेद शिखरजी, जिल्हा गिरिडीह (झारखंड) येथे दर्शन व धार्मिक यात्रेसाठी मनमाड शहरातून शेकडो भाविकांचा समूह शनिवारी, दि. २६ सप्टेंबर रोजी उत्साहात रवाना झाला. मनमाड रेल्वे स्थानकावर यात्रेकरूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. या धार्मिक यात्रेत महिला, पुरुष तसेच लहान मुलांचाही मोठ्या संख्येने सहभाग आहे. यात्रेला रवाना होताना भाविकांनी *"जय पार्श्वनाथ"*चा जयघोष करत परिसर भक्तिमय केला. धार्मिक श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात भाविकांनी यात्रेचा शुभारंभ केला. अनेक दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान भाविकांकडून सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यात येणार असून विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चना आणि तीर्थवंदना केली जाणार आहे. जैन समाजाच्या धार्मिक परंपरेत सम्मेद शिखरजीला विशेष महत्त्व असल्याने या यात्रेबाबत भाविकांमध्ये विशेष उत्सुकता आहे.

वसंतनगर येथे महावितरणच्या कामावर ग्रामस्थांचा आक्षेप!

अपुऱ्या खोलीवर विद्युत खांब उभारल्याचा आरोप; वीजपुरवठा खंडित केल्याने नागरिकांमध्ये संताप

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी : तालुक्यातील वसंतनगर तांडा येथे मागील काही दिवसांपासून महावितरण कंपनीकडून केबल टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामाच्या पद्धतीवर ग्रामस्थांनी गंभीर आक्षेप घेतला असून, कोणतीही पूर्वसूचना न देता काम केले जात असल्याचा तसेच नागरिकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावात नवीन केबल टाकण्याच्या कामादरम्यान जुने विद्युत वायर काढण्यात येत आहेत. त्यामुळे गावातील काही भागातील वीजपुरवठा प्रभावित झाला असून, नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नवीन वीजमीटर घेण्याबाबतही पुरेशी माहिती न देता महावितरणचे अधिकारी व कर्मचारी गावात येऊन वीजपुरवठा खंडित करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचेही काही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. नवीन कनेक्शन मिळेपर्यंत जुनी जोडणी सुरू ठेवण्याची मागणी गावकऱ्यांनी महावितरणने नागरिकांना सहकार्य करून नवीन वीज जोडणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जुने वायर व कनेक्शन बंद करू नये, अशी मागणी केली आहे. सध्या दुष्काळसदृश परिस्थिती असून शेतकरी आर्थिक



अडचणीत असल्याने नवीन कनेक्शनचा खर्च करणे अनेकांना शक्य नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. नवीन कनेक्शनसाठी लागणारी डिमांड नोट व अन्य आवश्यक प्रक्रिया सुलभ करून देण्यात यावी, तसेच तोपर्यंत गावातील कोणत्याही गल्लीतील वीजपुरवठा खंडित करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. विद्युत खांबांच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह दरम्यान, गावात केबल टाकण्यासाठी नवीन विद्युत खांब उभारण्यात आले आहेत. हे खांब पुरेशा खोलीपर्यंत जमिनीत गाडण्यात आले नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. काही ठिकाणी खांब साधारण एक ते दीड फूट खोलीपर्यंतच गाडण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामस्थांनी याबाबत संबंधित कंत्राटदाराकडे विचारणा केली असता, ज्या ठिकाणी जमीन कडक आहे, तेथे महावितरणच्या निर्देशानुसार एक ते दीड फूट खोदून खांब उभे करण्याच्या सूचना असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. मात्र, याबाबत संबंधित महावितरण अधिकाऱ्यांकडून समाधानकारक माहिती मिळत नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. काही खांब वाकलेले असून काही खांबांना आवश्यक ताण दिलेला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे जोरदार वारा, पाऊस किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीच्या वेळी खांब कोसळण्याची शक्यता असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने कामाची तपासणी करण्याची मागणी गावातील विद्युत कामे संबंधित सुरक्षा नियम आणि तांत्रिक निकषांनुसार करण्यात यावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नव्याने उभारण्यात आलेले सर्व विद्युत खांब आवश्यक तांत्रिक निकषांनुसार व पुरेशा खोलीपर्यंत गाडण्यात यावेत, तसेच वाकलेले व असुरक्षित खांब तातडीने दुरुस्त अथवा बदलण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर!

१२ उपाययोजना लागू पाणी, चारा, रोजगार, अन्नधान्याची व्यवस्था; पीक नुकसानीची मदत

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली असून, या तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार 'Trigger-1' (प्रथम कळ) लागू करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, वीज सवलत, पाणी, चारा, रोजगार आणि अन्नधान्याच्या उपलब्धतेसह १२ उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. खरीप २०२६ हंगामाचा आढावा घेतल्यानंतर कृषी आयुक्तांनी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. पर्जन्यमानातील तूट तसेच अन्य संबंधित घटकांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये आता पीक परिस्थितीचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. पीक परिस्थितीचे छायाचित्रांसह सर्वेक्षण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. महसूल, कृषी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने क्षेत्रीय पातळीवर सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षणादरम्यान पिकांची प्रत्यक्ष स्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच GPS coordinates संकलित करून पीक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. पीक नुकसानीच्या मदतीबाबत विहित प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे आर्थिक मदत जाहीर केली जाणार आहे



दुष्काळग्रस्त भागात १२ उपाययोजना दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये पुढील उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत— जमीन महसुलात सूट. पीक कर्जाचे पुनर्गठन. शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती. कृषी पंपांच्या चालू वीजबिलात नियमानुसार सवलत. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी. रोजगार हमी योजनेतील कामांच्या निकषांमध्ये शिथिलता आणून अधिकाधिक कामे सुरू करणे. आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्यासाठी टँकरद्वारे पुरवठा. टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीजजोडणी खंडित न करणे. शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे. पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची व्यवस्था करणे. जलसंधारणाची कामे सुरू करणे. पिण्याचे पाणी तसेच जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे. सहा महसूल विभागांतील २६५ तालुक्यांचा समावेश 'Trigger-1' लागू झालेल्या तालुक्यांमध्ये राज्यातील सर्व सहा महसूल विभागांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीनुसार नाशिक विभागातील ४९, पुणे विभागातील ३५, छत्रपती संभाजीनगर विभागातील ७४, अमरावती विभागातील ५६ आणि नागपूर विभागातील ३९, तर ठाणे महसूल विभागातील १२ तालुक्यांचा समावेश आहे. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील एकूण ४९ तालुक्यांचा या यादीत समावेश आहे. त्यामुळे खान्देशातील शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. पाणी व चाऱ्याच्या उपलब्धतेवर भर दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा तसेच जलसंधारणाची कामे सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, दुष्काळग्रस्त भागातील पीक नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी पंचनामे आणि पीक सर्वेक्षणाची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पीक नुकसानीच्या आर्थिक मदतीबाबत स्वतंत्र निर्णय घेतला जाणार आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली असून, या तालुक्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार 'Trigger-1' (प्रथम कळ) लागू करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, वीज सवलत, पाणी, चारा, रोजगार आणि अन्नधान्याच्या उपलब्धतेसह १२ उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. खरीप २०२६ हंगामाचा आढावा घेतल्यानंतर कृषी आयुक्तांनी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. पर्जन्यमानातील तूट तसेच अन्य संबंधित घटकांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये आता पीक परिस्थितीचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. पीक परिस्थितीचे छायाचित्रांसह सर्वेक्षण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. महसूल, कृषी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने क्षेत्रीय पातळीवर सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षणादरम्यान पिकांची प्रत्यक्ष स्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच GPS coordinates संकलित करून पीक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

गोकुळ आशिर्वाद मित्र मंडळाच्या बाप्पाला जल्लोषात निरोप



जन सम्राट टाईम्स

उल्हासनगर| प्रतिनिधी उल्हासनगर शहरातील प्रसिद्ध गोकुळ आशिर्वाद मित्र मंडळाच्या श्री गणरायाला भक्तिमय वातावरणात आणि ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात निरोप देण्यात आला. गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या गणेशोत्सवाची सांगता भक्तांच्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने झाली. यंदाच्या गणेशोत्सवादरम्यान मंडळाने धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन केले. पर्यावरणपूरक देखाव्यासह रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आदी सामाजिक उपक्रम राबवून मंडळाने सामाजिक सहभागाची परंपरा कायम ठेवली. ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन मिरवणूक विसर्जन मिरवणुकीची सुरुवात मंडळाच्या ठिकाणी श्री गणरायाची आरती करून करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तांच्या जयघोषात मिरवणुकीला सुरुवात झाली. महिला, लहान मुले तसेच मंडळाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीदरम्यान भक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी, सर्व सभासद तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. मंडळाच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले की, "गेली अनेक वर्षे आम्ही एकोप्याने गणेशोत्सव साजरा करीत आहोत. सर्व सभासद आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे उत्सव यशस्वीपणे पार पडतो. बाप्पाच्या आशीर्वादाने मंडळाची सामाजिक आणि धार्मिक वाटचाल अशीच सुरू राहावी, हीच भावना आहे." पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने विसर्जन शांततेत विसर्जन घाटावर पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने श्री गणेशमूर्तीचे विसर्जन शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मंडळाच्या स्वयंसेवकांनी विशेष काळजी घेतली. स्वयंसेवकांनी मिरवणुकीत सहभागी भाविकांना आवश्यक सहकार्य केले. विसर्जनानंतर उपस्थित भाविक व नागरिकांना मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भक्तिमय वातावरणात झालेल्या या विसर्जन सोहळ्याने दहा दिवसांच्या गणेशोत्सवाची उत्साहपूर्ण सांगता झाली. उल्हासनगर शहरातील प्रसिद्ध गोकुळ आशिर्वाद मित्र मंडळाच्या श्री गणरायाला भक्तिमय वातावरणात आणि ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात निरोप देण्यात आला.

तापी नदीकाठी धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे निर्माल्य संकलन!

५,२८७ गणेशमूर्ती व गणेश मंडळांचे निर्माल्य संकलित

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: अनंत चतुर्दशीनिमित्त तापी नदीकाठी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड) यांच्या वतीने निर्माल्य संकलनाचा उपक्रम राबविण्यात आला. पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात भुसावळ व यावल तालुक्यातील ४४८ सदस्यांनी सहभाग घेतला. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर भुसावळ शहरातील तापी नदीवरील पुलाच्या चारही बाजूंना प्रतिष्ठानच्या सदस्यांनी निर्माल्य संकलनासाठी व्यवस्था केली होती. गणेशोत्सवाच्या विसर्जनानंतर नदीपात्रात निर्माल्य टाकले जाऊ नये, तसेच नदीचे प्रदूषण रोखले जावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या मोहिमेदरम्यान घरगुती गणेशमूर्ती तसेच विविध गणेश मंडळांकडून



एकूण ५,२८७ ठिकाणांहून निर्माल्य संकलित करण्यात आले. संकलित निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी एकूण ७ ट्रॅक्टर वापरण्यात आले. प्रतिष्ठानच्या सदस्यांनी जागेवरच निर्माल्याचे विलगीकरण करून त्यातील सुमारे १८ टन निर्माल्य वृक्षांसाठी खतनिर्मिती करण्याच्या उद्देशाने समर्थ बैठक, अट्रावल येथे पाठविले. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक नागरिकांनी नदीकाठी किंवा विसर्जनस्थळी निर्माल्य न टाकता ते प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांकडे सुपूर्द केले. त्यामुळे निर्माल्य संकलनासोबतच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेशही नागरिकांपर्यंत पोहोचला. विशेष म्हणजे, अनेक नागरिकांनी यापुढे निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये संकलित करणार नसल्याचा स्वैच्छिक संकल्प केला. निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन आणि प्लास्टिकमुक्त पर्यावरणाच्या दृष्टीने हा संकल्प महत्त्वपूर्ण मानला जात आहे. उपक्रमस्थळी उपस्थित प्रशासनातील अधिकारी तसेच नागरिकांनी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आलेल्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले. गणेशोत्सवातील श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम ठरला.

नाशिक महामार्गावर वाहतूक कोंडी; भिवंडीत १० किलोमीटर वाहनांच्या रांगा

अंजूरफाटा ते खारेगाव टोलनाक्यापर्यंत वाहनचालकांचे हाल

जन सम्राट टाईम्स

भिवंडी / नाशिक (प्रतिनिधी): भिवंडी : मुंबई-नाशिक महामार्गावर शनिवारी सकाळपासून वाहतुकीचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती समोर आली आहे. भिवंडी परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, स्थानिक माहितीनुसार ही कोंडी सुमारे १० किलोमीटरपर्यंत पसरली आहे. अवघ्या १५ मिनिटांत पूर्ण होणाऱ्या अंतरासाठी वाहनचालकांना तब्बल २ ते ३ तास लागत असल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. खड्डे, अवजड वाहनांची गर्दी आणि वाढलेली वाहतूक प्राथमिक माहितीनुसार, भिवंडी बायपास तसेच खारेगाव टोलनाका परिसरातील रस्त्यावरील खड्डे आणि रस्त्याची दुरवस्था यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला आहे. त्यातच नाशिक, धुळे तसेच गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या ट्रक आणि कंटेनरची मोठी संख्या असल्याने महामार्गावरील वाहतुकीवर अतिरिक्त ताण पडल्याचे सांगण्यात येत आहे. गणेशोत्सवानंतर सुट्ट्या संपून मुंबई, ठाणे आणि



आसपासच्या भागात परतणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्यानेही वाहतूक कोंडी अधिक तीव्र झाल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. पत्रकार विजयकुमार पाटील यांनीही या वाढलेल्या वाहतुकीकडे लक्ष वेधले आहे. अंजूरफाट्यापासून खारेगावपर्यंत कोंडी भिवंडीतील अंजूरफाटा, कामतघर, मानकोली नाका परिसरापासून खारेगाव टोलनाक्यापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे मुंबईच्या दिशेने तसेच नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांच्या प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाढला. रुग्णवाहिका, शालेय बसही अडकल्या वाहतूक कोंडीचा फटका सर्वसामान्य प्रवाशांसह रुग्णवाहिका, शालेय बस आणि कामावर जाणाऱ्या नोकरदारांना बसला. अनेक वाहनचालकांना बराच वेळ वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले. काही प्रवाशांनी या परिस्थितीचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. एका प्रवाशाने सांगितले, "सकाळी ८ वाजता भिवंडीतून निघालो; बराच वेळ झाला तरी ठाण्याला पोहोचता आले नाही. काही किलोमीटरच्या अंतरासाठी तासन्तास लागत आहेत." वाहतूक पोलिसांची धावपळ कोंडीची माहिती मिळताच भिवंडी वाहतूक पोलीस आणि महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले.

आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात मुक्ताईनगरात नियोजन बैठक!

जन सम्राट टाईम्स

मुक्ताईनगर। प्रतिनिधी: अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला विरोध आणि अनुसूचित जातींच्या एकतेचा मुद्दा मांडण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेना व सामाजिक कार्यकर्त्यांची नियोजन बैठक शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी मुक्ताईनगर येथील विश्रामगृहात पार पडली. दुपारी ४ वाजता झालेल्या या बैठकीत आगामी आंदोलनाच्या पूर्वतयारीबाबत चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या एकूण ५९ जातींची अधिकृत यादी समाजकल्याण आयुक्तालयाने प्रसिद्ध केली आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर विविध सामाजिक संघटनांकडून भूमिका मांडल्या जात आहेत. मुक्ताईनगरातील बैठकीतही या विषयावर चर्चा करण्यात आली. ४ ऑक्टोबरच्या महामोर्चाची पूर्वतयारी बैठकीत रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी जळगाव येथील शिवतीर्थ मैदान, कोर्ट चौक येथे



आयोजित करण्यात आलेल्या जनआक्रोश महामोर्चाच्या पूर्वतयारीवर सविस्तर चर्चा झाली. मुक्ताईनगर तालुक्यातून समाजबांधवांचा सहभाग वाढविण्यासाठी संपर्क व नियोजन करण्याबाबत बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. तसेच, येत्या दोन-तीन दिवसांत मुक्ताईनगर तालुक्यातील समाजबांधवांची मोठी बैठक आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस जिल्हास्तरीय नेते तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती या बैठकीस जिल्हाध्यक्ष लखनभाऊ पानपाटील, उपजिल्हाध्यक्ष अजयभाऊ शेलार, मुक्ताईनगर तालुका अध्यक्ष अतुलभाऊ अटकाळे, शहराध्यक्ष लकीभाऊ गाढे, सोशल मीडिया प्रमुख समीरभाऊ गाढे तसेच पँथर कार्यकर्ते राहुलभाऊ पानपाटील उपस्थित होते. याशिवाय सामाजिक कार्यकर्ते नानाभाऊ बोदडे, वानखेडे काका, पी. जे. भाऊ बोदडे, अजयभाऊ तायडे, योगेशभाऊ पानपाटील यांच्यासह पँथर सेनेचे कार्यकर्ते आणि समाजबांधव उपस्थित होते. लवकरच मुक्ताईनगर विश्रामगृह येथे जिल्हास्तरीय नेत्यांच्या उपस्थितीत व्यापक बैठक घेण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

अनोरे गावात सत्यशोधक पद्धतीने दशपिंड व गंधमुक्ती कार्यक्रम

'गुलामगिरी' हा सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा; अंधश्रद्धा व कर्मकांडापासून मुक्त होण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: तालुक्यातील अनोरे येथे ज्ञानेश्वर दत्तू महाजन यांचे वडील निसर्गवासी दत्तू हरी महाजन यांच्या दशपिंड, गंधमुक्ती व उत्तरकार्याचा विधी सत्यशोधक पद्धतीने पार पडला. पारंपरिक कर्मकांडाला फाटा देत सामाजिक प्रबोधन, महापुरुषांचे विचार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत, महापुरुष आणि महामाता यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सत्यशोधक पद्धतीने विधी पार पाडताना सत्यशोधक विधीकर्ते शिवदास महाजन यांनी सत्यशोधक समाजाची प्रार्थना सादर करून उपस्थितांचे प्रबोधन केले. यावेळी सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील म्हणाले की, अंधश्रद्धा व कर्मकांडापासून मुक्त होऊन सत्यशोधक विचारांच्या मार्गाने समाजाने वाटचाल करणे गरजेचे आहे. शिक्षण हे मानवमुक्तीचे प्रभावी साधन असून, महात्मा ज्योतिराव फुले लिखित 'गुलामगिरी' हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा आहे, असे त्यांनी सांगितले.

गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी सत्यशोधक पद्धतीने विवाह, दशक्रिया विधी, गृहप्रवेश आदी सामाजिक विधी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच 'मराठी वारसा' या यूट्यूब चॅनेलवरील सावित्रीबाई



जोतिराव फुले यांच्यावरील मालिका सहकुटुंब पाहावी आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा खरा इतिहास जाणून घ्यावा, असे आवाहन पी. डी. पाटील यांनी केले. सत्यशोधक विधीकर्ते शिवदास महाजन यांनीही सत्यशोधक विचारांची गरज स्पष्ट करत सामाजिक परिवर्तनासाठी प्रबोधनात्मक उपक्रमांना चालना देण्याचे आवाहन केले. माळी समाजाध्यक्ष हरी महाजन आणि सरपंच स्वप्निल महाजन यांनी मनोगत व्यक्त करून निसर्गवासी दत्तू हरी महाजन यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.

या सत्यशोधक विधीची प्रेरणा सत्यशोधक समाज संघाचे अध्यक्ष अरविंद खैरनार आणि सचिव डॉ. सुरेश झाल्टे यांच्याकडून मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विशेष म्हणजे कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व पितरांच्या स्मरणार्थ महापुरुषांचे अनमोल ग्रंथ भेट देण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोकडे परिवाराच्या माध्यमातून शेत परिसरात लिंब, पिंपळ आणि वड या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यामुळे श्रद्धेसोबत सामाजिक प्रबोधन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम ठरला. यावेळी मधुकर नामदेव देशमुख (उपाध्यक्ष, बी. जे. विद्यालय), हरी तुकाराम महाजन (माळी समाजाध्यक्ष), स्वप्निल लक्ष्मण महाजन (सरपंच), भाऊसाहेब संभाजी पाटील (पोलीस पाटील), ज्ञानदेव राजाराम पाटील (विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन), रवींद्र लोटन चव्हाण, त्र्यंबक रोकडे, रघुनाथ रोकडे, नामदेव रोकडे, सुरेश रोकडे, संतोष रोकडे, राजेंद्र रोकडे यांच्यासह गावातील सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, क्रीडा, साहित्य व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.तालुक्यातील अनोरे येथे ज्ञानेश्वर दत्तू महाजन यांचे वडील निसर्गवासी दत्तू हरी महाजन यांच्या दशपिंड, गंधमुक्ती व उत्तरकार्याचा विधी सत्यशोधक पद्धतीने पार पडला. पारंपरिक कर्मकांडाला फाटा देत सामाजिक प्रबोधन, महापुरुषांचे विचार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

नवागढ अतिक्षेत्रात पर्युषण पर्वानिमित्त श्री १००८ नेमिनाथ भगवानांचा अभिषेक

जन सम्राट टाईम्स

नवागढ । प्रतिनिधी: रामचंद्र अन्नदाते) – श्री १००८ नेमिनाथ भगवान अतिक्षेत्र, नवागढ येथे पर्युषण पर्व मोठ्या भक्तिभावाने साजरे करण्यात येत आहे. पर्वानिमित्त मंदिरात श्री १००८ नेमिनाथ भगवानांचा विधिवत अभिषेक, पूजन व आरती करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

अभिषेक व पूजनाच्या वेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी भगवान नेमिनाथ यांच्या चरणी श्रद्धापूर्वक नतमस्तक होत सुख, शांती व समृद्धीसाठी प्रार्थना केली. पर्युषण पर्वाच्या निमित्ताने संयम, अहिंसा, आत्मशुद्धी आणि सदाचाराचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात आला. पर्युषण पर्व हे आत्मचिंतन, संयम आणि आध्यात्मिक साधनेला महत्त्व देणारे पर्व मानले जाते. या काळात धार्मिक विधींसोबतच आत्मपरीक्षण व सद्विचारांना प्राधान्य दिले जाते. त्याच भावनेतून नवागढ अतिक्षेत्रात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मंदिरातील आकर्षक काचकाम, सुबक धार्मिक सजावट आणि प्रसन्न वातावरणामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. अभिषेक व पूजनासाठी उपस्थित भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. पर्युषण पर्वानिमित्त नवागढ येथील श्री १००८ नेमिनाथ भगवान अतिक्षेत्रात धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून, भाविकांकडून विविध धार्मिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला जात आहे.

चोपडा आगारात पाच नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल

आमदार प्रा. चंद्रकांत अण्णा सोनवणे व माजी आमदार लताताई सोनवणे यांच्या हस्ते लोकार्पण; प्रवाशांमध्ये समाधान

जन सम्राट टाईम्स

चोपडा। प्रतिनिधी: चोपडा एसटी आगारातील बसची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन आगाराच्या ताफ्यात पाच नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल करण्यात आल्या आहेत. या अद्ययावत बसेसचा लोकार्पण सोहळा चोपडा एसटी आगारात आमदार प्रा. चंद्रकांत अण्णा सोनवणे आणि माजी आमदार सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते पार पडला. चोपडा एसटी आगारात बसची संख्या वाढविण्याची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून आतापर्यंत ३० बसेस मंजूर करून घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले. नव्याने दाखल झालेल्या पाच 'राजमाता जिजाऊ' बसेसमुळे आगाराच्या वाहतूक व्यवस्थेला आणखी बळ मिळणार आहे. यावर्षी चोपडा आगारात २० एसी, १० डिझेल आणि पाच राजमाता जिजाऊ, अशा एकूण ३५ नव्या बसेस दाखल झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नव्या बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांसह विद्यार्थी वर्गाला अधिक सुलभ आणि नियमित प्रवासाची सुविधा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. राज्यात एसटी महामंडळाकडून आणखी ५ हजार नव्या बसेसची खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून टाटा मोटर्सची निविदेत सर्वांत कमी बोली आली आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सप्टेंबरमध्ये दिली होती. नव्या बसेसच्या माध्यमातून एसटी सेवा अधिक सक्षम करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. यावेळी आमदार प्रा. चंद्रकांत



सोनवणे यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे चोपडा आगाराला नव्या बसेस मिळाल्याचे सांगितले. परिवहन व्यवस्था ही विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, भविष्यातही चोपडा विभागासाठी अधिक निधी व बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या लोकार्पण सोहळ्यास तहसीलदार भाऊसाहेब थोरात, लोकनियुक्त नगराध्यक्ष नम्रता पाटील, महात्मा गांधी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. स्मिताताई पाटील, उपनगराध्यक्ष पंकज बोरोले, सुरेश बापू पाटील, मंगलताई पाटील, शिवराज पाटील, किरण देवराज, प्रताप अण्णा पाटील, प्रकाश रजाळे, नगरसेवक दीपक पाटील, हनिफ सत्तार, अमोल पाटील, नगरसेविका दीपाली चव्हाण, रुकसारबी बागवान, सविता पाटील, स्वाती बडगुजर, शीतल देवराज, माजी नगरसेवक महेंद्र धनगर, विकास पाटील, प्रकाश राजपूत, युवराज अलकरी, दीपक चौधरी, पुंडलिक महाजन, सुनील बरडिया, प्रदीप बारी, गोपाल चौधरी, निलेश पाटील चहार्डी, दशरथ बाविस्कर, शाम पाटील, राजेंद्र पाटील, मुन्ना ठाकूर, गोविंदा कोळी, प्रताप पाटील, एस. आर. पाटील, राहुल पाटील लासुर, देविदास पाटील, नंदू गवळी, दिव्यांक सावंत, विशाल पाटील, लोकेश पाटील, अकील जहागिरदार, फरमान मिस्तरी, संदीप पाटील, किरण चौधरी, गणेश पाटील, राहुल पाटील यांच्यासह विभाग नियंत्रक यज्ञेश बोरसे, आगार व्यवस्थापक संदेश क्षिरसागर, यांत्रिकी उपअभियंता किशोर पाटील, चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी, आगारातील अधिकारी-कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या बसेसच्या समावेशामुळे चोपडा आगाराच्या बससेवेला अधिक बळ मिळाले असून प्रवाशांच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी ही भर उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. चोपडा एसटी आगारातील बसची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन आगाराच्या ताफ्यात पाच नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल करण्यात आल्या आहेत. या अद्ययावत बसेसचा लोकार्पण सोहळा चोपडा एसटी आगारात आमदार प्रा. चंद्रकांत अण्णा सोनवणे आणि माजी आमदार सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते पार पडला. चोपडा एसटी आगारात बसची संख्या वाढविण्याची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून आतापर्यंत ३० बसेस मंजूर करून घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले. नव्याने दाखल झालेल्या पाच 'राजमाता जिजाऊ' बसेसमुळे आगाराच्या वाहतूक व्यवस्थेला आणखी बळ मिळणार आहे. यावर्षी चोपडा आगारात २० एसी, १० डिझेल आणि पाच राजमाता जिजाऊ, अशा एकूण ३५ नव्या बसेस दाखल झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नव्या बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांसह विद्यार्थी वर्गाला अधिक सुलभ आणि नियमित प्रवासाची सुविधा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

बोरगावचा अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न



जन सम्राट टाईम्स

बोरगाव खुर्द| प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील बोरगाव खुर्द व बोरगाव बु. येथील श्री विठ्ठल मंदिर संस्थानच्या वतीने गेल्या १२१ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या हरिनाम कीर्तन सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. वैकुंठवासी ह.भ.प. तुकाराम महाराज बोरगाव व वैकुंठवासी ह.भ.प. तुकाराम महाराज चाळीसगावकर यांच्या प्रेरणेतून तसेच संतांच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या अनमोल सहकार्याने ही परंपरा अव्याहतपणे सुरू आहे. भाद्रपद शु. अष्टमी, शनिवार दि. १९ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला. शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी सप्ताहाची सांगता करण्यात आली. सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम, हरिनाम संकीर्तन आणि कीर्तनाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक विचारांचे मार्गदर्शन मिळाले.

सांगतेच्या दिवशी ह.भ.प. देवेंद्र महाराज माळसांगवी यांचे काल्याचे कीर्तन झाले. महाराजांनी आपल्या कीर्तनातून भक्ती, नामस्मरण आणि संतपरंपरेचे महत्त्व विशद केले. यावेळी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान 'विठ्ठल-विठ्ठल'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी ह.भ.प. प्रभाकर नामदेव कंखरे महाराज तसेच बोरगाव खुर्द व बोरगाव बु. येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. ग्रामस्थ आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे १२१ वर्षांची ही धार्मिक परंपरा यंदाही उत्साहात पार पडली. धरणगाव तालुक्यातील बोरगाव खुर्द व बोरगाव बु. येथील श्री विठ्ठल मंदिर संस्थानच्या वतीने गेल्या १२१ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या हरिनाम कीर्तन सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. वैकुंठवासी ह.भ.प. तुकाराम महाराज बोरगाव व वैकुंठवासी ह.भ.प. तुकाराम महाराज चाळीसगावकर यांच्या प्रेरणेतून तसेच संतांच्या आशीर्वादाने आणि ग्रामस्थांच्या अनमोल सहकार्याने ही परंपरा अव्याहतपणे सुरू आहे. यंदाच्या सप्ताहाला भाद्रपद शु. अष्टमी, शनिवार दि. १९ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला. शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी सप्ताहाची सांगता करण्यात आली. कीर्तनाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक विचारांचे मार्गदर्शन मिळाले. सांगतेच्या दिवशी ह.भ.प. देवेंद्र महाराज माळसांगवी यांचे काल्याचे कीर्तन झाले.

'मालक चहा' कॉफी अँड शेक दालनाचा शुभारंभ!

आमदार ॲड. अमोल चिमणराव पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: पारोळा शहरातील बाजारपेठ परिसरातील मोहरीर शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'मालक चहा – Coffee & Shake' या दालनाचा शुभारंभ आमदार ॲड. अमोल चिमणराव पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. यावेळी आमदार ॲड. अमोल चिमणराव पाटील यांनी दालनाला भेट देत फीत कापून उद्घाटन केले. नव्या व्यवसायाची सुरुवात करणारे संचालक विकास भोई व शुभम राठोड यांचे अभिनंदन करून त्यांच्या व्यवसायाच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत चहा, कॉफी आणि विविध प्रकारच्या शेकचा आस्वाद घेण्यासाठी तसेच मित्रपरिवारासोबत निवांत वेळ घालविण्यासाठी शहरात नव्या संकल्पनेतून सुरू झालेले हे दालन ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन व्यवसाय सुरू करणाऱ्या युवा उद्योजकांनी चिकाटी, मेहनत, दर्जेदार सेवा आणि ग्राहकांशी आपुलकीचे संबंध



यांना प्राधान्य देत व्यवसायाची यशस्वी वाटचाल करावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या शुभारंभप्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत पाटील, शिवसेना शहरप्रमुख, गटनेते तथा नगरसेवक अमृतभाऊ चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनिषभाऊ पाटील, माजी उपनगराध्यक्ष दीपकभाऊ अनुष्ठान, शिवसेना उपगटनेते तथा नगरसेवक पंकजभाऊ मराठे, शिवसेना प्रतोद तथा नगरसेवक नितीनभाऊ सोनार, दगडू पवार सर यांच्यासह रामराज्य कोळी गल्ली मित्र परिवार, राम मंदिर चौक मित्र परिवार, पंचमुखी मित्र परिवार तसेच मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्या व्यवसायाच्या माध्यमातून पारोळा शहरातील ग्राहकांना चहा, कॉफी आणि शेकचा दर्जेदार आस्वाद घेण्यासाठी एक नवे ठिकाण उपलब्ध झाले आहे. विकास भोई व शुभम राठोड यांच्या 'मालक चहा – Coffee & Shake' या नव्या व्यवसायाला उपस्थितांनी शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. पारोळा शहरातील बाजारपेठ परिसरातील मोहरीर शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'मालक चहा – Coffee & Shake' या दालनाचा शुभारंभ आमदार ॲड. अमोल चिमणराव पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. यावेळी आमदार ॲड. अमोल चिमणराव पाटील यांनी दालनाला भेट देत फीत कापून उद्घाटन केले. नव्या व्यवसायाची सुरुवात करणारे संचालक विकास भोई व शुभम राठोड यांचे अभिनंदन करून त्यांच्या व्यवसायाच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत संजना मोरेची विभागीय स्पर्धेसाठी निवड

जन सम्राट टाईम्स

पारोळा। (प्रतिनिधी): चाळीसगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, टेहू, ता. पारोळा संचलित श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड येथील विद्यार्थिनी कु. संजना विजय मोरे हिने दमदार कामगिरी करत १४ वर्षांखालील ४६ किलो वजन गटात नाशिक विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड निश्चित केली आहे.

संजना मोरे हिने जिल्हास्तरीय स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड तसेच चोरवड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संजना हिच्या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन, क्रीडा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगण्यात आले. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर तिने विभागीय स्पर्धेतील स्थान निश्चित केले आहे.

संजना मोरे हिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार वसंतराव मोरे, जिल्हा दूध संघाचे संचालक पराग मोरे, पारोळा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष रोहन मोरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद पाटील, तालुका क्रीडा अधिकारी जगदीश चौधरी, गटशिक्षणाधिकारी, माजी गटशिक्षणाधिकारी विश्वास हरी पाटील, तालुका समन्वयक संदीप पाटील, मार्गदर्शक प्रमोद पाटील (भोंडण), क्रीडा शिक्षक उमेश पाटील तसेच विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



यावेळी संजना मोरे हिने आगामी विभागीय कुस्ती स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड, चोरवड गाव आणि पारोळा तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या. चाळीसगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत सहजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, टेहू, ता. पारोळा संचलित श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड येथील विद्यार्थिनी कु. संजना विजय मोरे हिने दमदार कामगिरी करत १४ वर्षांखालील ४६ किलो वजन गटात नाशिक विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड निश्चित केली आहे. संजना मोरे हिने जिल्हास्तरीय स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट कुस्ती कौशल्याचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे श्री. दत्त माध्यमिक विद्यालय, चोरवड तसेच चोरवड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संजना हिच्या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन, क्रीडा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगण्यात आले. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर तिने विभागीय स्पर्धेतील स्थान निश्चित केले आहे.

भ्रातृमंडळ अकोलाची वार्षिक आमसभा व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

जन सम्राट टाईम्स

अकोला। प्रतिनिधी: भ्रातृमंडळ अकोला या समाजसेवी संस्थेची वार्षिक आमसभा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी प्रभा लेआउट, शास्त्रीनगर येथील मंडळाच्या इमारतीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वतीच्या मूर्तीसह भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. आमसभेच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. राजीव इंगळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक येथील सुप्रसिद्ध समुपदेशक डॉ. प्रमोद हरी महाजन उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष सोमाभाऊ खर्चे, कोषाध्यक्ष प्रवीण वराडे, सचिव श्रीकृष्ण नारखेडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत केल्यानंतर मागील वर्षभरात निधन झालेल्या मंडळाच्या सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात



उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण १६ गुणवंत व प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. आमसभेत मागील आमसभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. तसेच सन २०२५-२६ चा वार्षिक जमाखर्च अहवाल आणि सन २०२६-२७ चे वार्षिक अंदाजपत्रक सभेसमोर सादर करण्यात आले. उपस्थित सभासदांच्या मंजुरीनंतर विविध विषयांवरील कामकाज खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. प्रमोद हरी महाजन यांनी उपस्थितांना समाजप्रबोधनपर मार्गदर्शन केले. बदलत्या सामाजिक परिस्थितीत सकारात्मक विचार, शैक्षणिक प्रगती आणि समाजातील परस्पर सहकार्याचे महत्त्व त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणानंतर उपस्थितांचे आभार मानून आमसभेची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव महेंद्रकुमार चौधरी यांनी केले, तर आभारप्रदर्शन अवंतिका खर्चे यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सभासद व उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि समाजप्रबोधनपर मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला उत्साही व प्रेरणादायी वातावरण लाभले.

काकडदा आश्रमशाळेच्या मुलींची कबड्डीत विजयी भरारी

जिल्हास्तरीय स्पर्धेत ३७ गुणांनी दणदणीत विजय; विभागीय स्तरावर करणार नंदुरबार जिल्ह्याचे नेतृत्व

जन सम्राट टाईम्स

धडगाव। प्रतिनिधी: नंदुरबार क्रीडा संकुल येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, काकडदा, ता. धडगाव येथील १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय विजेतेपद पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. या विजयानंतर काकडदा आश्रमशाळेचा संघ आता विभागीय स्तरावरील स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच काकडदा आश्रमशाळेच्या मुलींनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. उपांत्य फेरीतील दमदार कामगिरीनंतर संघाने अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामन्यातही मुलींनी सुरुवातीपासून आक्रमक आणि नियोजनबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर ५०-१३ असा ३७ गुणांच्या फरकाने दणदणीत विजय मिळविला. या सामन्यात काकडदा संघातील खेळाडूंनी चपळता, आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्दीचे उत्कृष्ट दर्शन घडविले.

बचाव आणि आक्रमण यांचा योग्य समन्वय साधत मुलींनी सामन्यावर सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. त्यांच्या दमदार खेळामुळे प्रतिस्पर्धी संघाला सामन्यात पुनरागमनाची संधीच मिळाली नाही. या यशामागे खेळाडूंची कठोर मेहनत, नियमित सराव, सांघिक भावना आणि जिंकण्याची जिद्द महत्त्वपूर्ण ठरली. तसेच क्रीडा शिक्षक शैलेंद्र वळवी



यांच्या नियोजनबद्ध प्रशिक्षण व मार्गदर्शनाचा संघाला मोठा फायदा झाला.

शाळेचे मुख्याध्यापक, अधीक्षक-अधीक्षिका, वर्गशिक्षक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य दिले. या विजेतेपदामुळे काकडदा शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. आता विभागीय स्तरावर नंदुरबार जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी या संघाला मिळाली असून, आगामी स्पर्धेसाठी खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

विजेत्या संघातील खेळाडू : गीता ठाकरे, सोनाली पाडवी, प्रियंका पाडवी, ललिता वळवी, अनिता वळवी, रतिला वळवी, नेहा शेमले, जयश्री पाडवी, रविना वळवी, राधा पटले, आरुषी वळवी आणि निशा वळवी. या उल्लेखनीय यशाबद्दल विजेत्या कबड्डी संघातील सर्व खेळाडू, क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक, अधीक्षक-अधीक्षिका तसेच संपूर्ण शिक्षक व कर्मचारीवर्गाचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. "मेहनत, शिस्त, संघभावना आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर काकडदा आश्रमशाळेच्या मुलींनी कबड्डीत जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. विभागीय स्तरावरही त्या अशीच दमदार कामगिरी करतील," असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. शालेय कबड्डी स्पर्धेत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, काकडदा, ता. धडगाव येथील १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय विजेतेपद पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. या विजयानंतर काकडदा आश्रमशाळेचा संघ आता विभागीय स्तरावरील स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच काकडदा आश्रमशाळेच्या मुलींनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. उपांत्य फेरीतील दमदार कामगिरीनंतर संघाने अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामन्यातही मुलींनी सुरुवातीपासून आक्रमक आणि नियोजनबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर ५०-१३ असा ३७ गुणांच्या फरकाने दणदणीत विजय मिळविला. या सामन्यात काकडदा संघातील खेळाडूंनी चपळता, आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्दीचे उत्कृष्ट दर्शन घडविले.

शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी कपिल अविनाश सोनवणे!



जन सम्राट टाईम्स

ममुराबाद| प्रतिनिधी: जि. प. केंद्र शाळा, ममुराबाद येथे शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शासनाच्या नियमानुसार व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करीत झालेल्या या निवड प्रक्रियेत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी कपिल अविनाश सोनवणे, तर उपाध्यक्षपदी अल्ताफ पटेल यांची निवड करण्यात आली. यावेळी समितीच्या सदस्यपदी अशोक कोळी, अनंत कुंभार यांच्यासह एकूण १९ सदस्यांची निवड करण्यात आली. निवड प्रक्रिया पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीने पार पडल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्यांचे उपस्थितांकडून अभिनंदन करण्यात आले. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सकारात्मक उपक्रम राबविण्याचा निर्धार नवनिर्वाचित समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे, शाळेच्या विकासात पालकांचा सहभाग वाढविणे तसेच शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यासाठी समिती प्रभावीपणे कार्य करेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.